आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

सोमवार दिनांक १९ जानेवारी २०२६

ठळक बातम्या

- राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या महापौर पदासाठी आरक्षणाची सोडत येत्या गुरुवारी.
- दावोसच्या जागतिक आर्थिक मंचाच्या परिषदेत गेल्या वर्षीपेक्षा जास्त गुंतवणूक आणण्याचं राज्य शासनाचं उद्दिष्ट.
- भाजपचे ज्येष्ठ नेते आणि विधान परिषदेचे आमदार संदीप जोशी यांचा सक्रिय राजकारणातून निवृत्तीचा निर्णय.
- विदर्भाने पहिल्यांदाच विजय हजारे ट्रॉफी जिंकून रचला इतिहास; अंतिम फेरीत सौराष्ट्रावर 38 धावांनी मात.

महापौर आरक्षणाची सोडत

राज्यातील २९ महापालिकांच्या महापौर पदांचं आरक्षण निश्चित करण्यासाठी येत्या गुरुवारी मंत्रालयात आरक्षणाची सोडत काढली जाणार आहे. नगरविकास राज्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली ही सोडत काढली जाणार आहे. राज्यात नुकत्याच २९ महापालिकांच्या निवडणुका पार पडल्या. भाजपसह सत्ताधारी महायुतीने बहुतांश महापालिकेत घवघवीत यश मिळविले आहे. महापालिका निवडणुकांच्या निकालानंतर आता सत्ता स्थापनेच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. गुरुवारी महापौर पदासाठी आरक्षण निश्चित झाल्यानंतर विविध महापालिकांमध्ये महापौर निवडीची प्रक्रिया सुरू होईल.

दावोस

जागतिक आर्थिक मंचाची बैठक आज स्वित्झर्लंडमधील दावोस इथं सुरु होत आहे. या ५६व्या वार्षिक बैठकीला ३ हजारहून अधिक जागतिक नेते उपस्थित राहणार आहेत. या पाच दिवस चालणाऱ्या परिषदेत सहभागी होण्यासाठी १०० हून अधिक भारतीय कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि सरकारी शिष्टमंडळ दावोसमध्ये दाखल झाले आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव, प्रल्हाद जोशी आणि के. राममोहन नायडू यांच्यासह महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, आसाम आणि

झारखंडचे मुख्यमंत्री विविध देशांच्या गुंतवणूकदारांसमोर आपापल्या राज्यांचे सादरीकरण करतील. कर्नाटक, उत्तर प्रदेश, केरळ आणि तेलंगणासह विविध राज्य सरकारांच्या कामाची माहिती देणाऱ्या प्रदर्शनात ते सहभागी होतील. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज दावोस परिषदेत सहभागी होणार आहेत. स्वित्झर्लंडमधे महाराष्ट्रमंडळाने काल त्यांच्या स्वागताप्रित्यर्थ विशेष कार्यक्रम आयोजित केला होता. भारतीय संस्कृतीला जागतिक स्तरावर प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र राज्य सरकारने महा-एनआरआय मंच स्थापन केल्याचं फडणवीस यांनी सांगितलं. राज्याची एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे वाटचाल वेगवान करण्यासाठी ही परिषद निर्णायक ठरेल, असं त्यांनी नमूद केलं. गेल्या वर्षी १६ लाख कोटी रुपयांचे गुंतवणूक करार झाले असून, यंदा त्याहून अधिक गुंतवणूक आणण्याचं उद्दिष्ट राज्य सरकारनं ठेवलं आहे.

संदीप जोशी

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि विधान परिषदेचे आमदार संदीप जोशी यांनी सक्रिय राजकारणातून निवृत्तीचा निर्णय जाहीर केला आहे. संपूर्ण भूमिका आणि निर्णयाचं कारण स्पष्ट करणारं पत्र त्यांनी प्रसिद्ध केलं आहे. या पत्रात सध्याची राजकीय संस्कृती, स्पर्धा आणि सत्तेसाठी वाढलेला संधीसाधूपणा, पक्षांतर आणि निष्ठावान कार्यकर्त्यांवरील अन्यायाबाबत त्यांनी भूमिका मांडली. १३ मे रोजी आमदारकीची मुदत पूर्ण झाल्यानंतर कोणतेही पद स्वीकारणार नसल्याचं त्यांनी जाहीर केलं. संदीप जोशी यांनी २०१९ ते २१ दरम्यान नागपूरचं महापौर पद देखील भूषवलं आहे. नागरसेवकापासून ते आमदार पदापर्यंत झालेल्या त्यांच्या प्रवासाबद्दल त्यांनी भारतीय जनता पक्षाचे आभार मानले आहे.

हिदायत पटेल

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते हिदायत पटेल यांच्या हत्येनंतर अकोला जिल्ह्यात राजकीय वातावरण तापलं असून या प्रकरणात स्थानिक राजकीय नेत्यांचा सहभाग असल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. मृत्यूपूर्वी संशयितांची नावे सांगितल्याचा दावा नातेवाईकांनी केला असून, त्यात काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे. या आरोपांची दखल घेत काँग्रेसने तात्काळ कारवाई करत संजय बोडखे आणि राजू बोचे यांना पक्षातून निलंबित केलं आहे अशी माहिती हिंदुस्थान समाचार या वृत्त संस्थेनं दिली आहे.

## जी राम जी

कॉंग्रेस पक्ष 'विकसित भारत जी राम जी' योजनेबद्दल जनतेची दिशाभूल करत असल्याचा आरोप कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी केला. ते आज नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत बोलत होते. या कायद्यानुसार ग्रामीण भागातल्या प्रत्येक कुटुंबाला किमान १२५ दिवसांच्या रोजगाराची हमी देण्यात आली असल्याचं ते म्हणाले.....

*सौ दिन के बजाय एक सौ पच्चीस दिन के काम की गारंटी अगर दी है तो विकसित भारत जी राम जी योजना के अंतर्गत दी गई है और केवल काम का अधिकार नहीं दिया है। पंद्रह दिन के अंदर बेरोजगारी भत्ता देना पड़ेगा। आपने कागज पर अधिकार दिया था, हमने जमीन पर उसको मजबूत करने का काम किया है। यह कानून पूरे देश में एक साथ लागू होगा। कोई भी ग्राम पंचायत इसके दायरे के बाहर नहीं रहेगी।*

मनरेगा अंतर्गत १० कोटी मालमत्ता निर्माण करण्यात आल्या असून, त्यापैकी साडे आठ कोटी मालमत्ता, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली निर्माण करण्यात आल्याची माहिती चौहान यांनी दिली. मोदी सरकारच्या काळात २५ कोटी लोकांना गरिबीतून मुक्त करण्यात आल्याचंही त्यांनी नमूद केलं.

## सराफा बाजार

मुंबईच्या सराफा बाजारात चांदीच्या किंमतीनं आज किलोमागे ३ लाख रुपयांचा टप्पा ओलांडला. अवघ्या ५ आठवड्यांमध्ये चांदी किलोमागे १ लाख रुपयांनी महाग झाली आहे. सोनंही तोळ्यामागे सव्वा २ हजार रुपयांनी महाग झालं. त्यामुळं २४ कॅरेट सोन्याचे दर १ लाख ४८ हजार रुपये तोळा आणि २२ कॅरेट सोन्याचे दर १ लाख ४४ हजार रुपये तोळ्यापेक्षा जास्त झाले आहेत.

बाबा ताजुद्दीन

सूफी संत हजरत बाबा ताजुद्दीन औलिया यांच्या जयंतीनिमित्त उद्या दिनांक २० ते २१ जानेवारीदरम्यान आनंद रोड, इंदोरा इथं विविध धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. उद्या सायंकाळी ७ वाजता ध्वजारोहण

आणि  रात्री ८ वाजता कव्वाल हबीब अजमेरा यांचा कव्वाली कार्यक्रम होणार आहे.  बुधवार २१ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजता भव्य शाही संदल मिरवणूक काढून बडा ताजबाग येथे मजारवर चादर अर्पण केली जाईल.  सायंकाळी ७ वाजता केक कापून जयंती साजरी केली जाणार असून त्यांनतर महाप्रसादाचं वितरण होणार आहे.

विजय हजारे ट्रॉफी

विदर्भाने पहिल्यांदाच विजय हजारे ट्रॉफी जिंकून इतिहास रचला. अंतिम फेरीत विदर्भाने सौराष्ट्राचा ३८ धावांनी पराभव केला. दोन्ही संघांमधील सामना बंगळुरूमध्ये खेळला गेला. गेल्या वर्षी अंतिम फेरीत कर्नाटककडून विदर्भाच्या संघाला पराभव स्वीकारावा लागला होता, मात्र यावेळी  अथर्व तायडेच्या शतकी खेळीच्या बळावर आणि  यश ठाकूर,  नचिकेत भुते च्या  भेदक गोलंदाजीमुळे विदर्भाने विजय हजारे चषक आपल्या नावावर केला. आधी रणजी, नंतर इराणी चषक आणि आता विजय हजारे ट्रॉफी जिंकल्याने हर्षोल्हास झाल्याची भावना कॅप्टन हर्ष दुबे यांनी आकाशवाणीशी बोलताना व्यक्त केली.

*एक महिन्याचा जे पण केलं, आपण मेहनत केले होते त्याचा रिजल्ट आला. आम्हाला आज चांगली फिलिंग आहे की जे काय आम्ही केलं ते टी ट्वेंटी मध्ये नाही झालं पण त्याच्यानंतर विजय हजारे मध्ये सगळ्यांनी चांगलं केलं. अमन मोखाडे ने चांगलं खूप चांगलं केलं आहे या वर्षी  आणि खूप रन काढले आणि यश ठाकूर ने पण आणि मला वाटतंय की सगळे बॉलर ने खूप कॉन्ट्रिब्यूशन केले आहेत. त्याच्यामुळे आपण या फायनल जिंकले. खूप मोठं अचिव्हमेंट आहे व्हीसीए चा की टीम ट्रॉफी जिंकले एवढे मोठे ट्रॉफी असतात सगळे आणि चांगली फिलिंग आहे की आपण हे सगळं एकच वर्षात मध्ये केलं.*

अथर्व तायडेने ११८ चेंडूत १५ चौकार आणि तीन षटकार मारत १२८ धावा केल्या. विदर्भाने उभारलेल्या ३१८ धावांचा पाठलाग करताना, सौराष्ट्राने लवकर विकेट गमावल्या. यश ठाकूरने ४, नचिकेत भुतेने ३, दर्शन नालकांडे ने २ आणि हर्ष दुबेने एक विकेट घेतली. विदर्भ संघाच्या या ऐतिहासिक विजयामुळे नागपुरातील क्रीडा प्रेमींमध्ये जल्लोषाचं वातावरण असल्याचं नागपूर क्रिकेट अकादमीचे प्रशिक्षक माधव बाकरे यांनी सांगितलं.

*आतापर्यंत विदर्भाच्या टीम बद्दल हे म्हटलं जायचं की विदर्भची टीम ही रेड बॉलची टीम आहे. पण व्हाईट बॉल म्हणजे मुश्ताक अली आणि विजय हजारे या ज्या दोन टूर्नामेंट्स असतात ज्यांना व्हाईट बॉल टूर्नामेंट म्हणतात. या पांढऱ्या बॉलने खेळले जातात. याच्यामध्ये आपली टीम खूप चांगलं करत नाही, असं लोकांचं म्हणणं होतं. पण आपण हे दाखवून दिलं आहे. मागच्या वर्षी सुद्धा आपण विजय हजारेची फायनल खेळलो होतो आणि या वर्षी तर आपण विजय हजारेचे चॅम्पियन झालेलो आहोत. तसं आपल्या इथल्या पोरांनी आणि कोचसने हे दाखवून दिलं की विदर्भची टीम ही फॉरमॅट मध्ये खूप चांगलं करून राहिली आहे. तर हे आम्हा सर्वांसाठी आणि इन्फॅक्ट पूर्ण विदर्भ साठी खूप गर्वाची बाब आहे.*

हवामान

हवामान**!** विदर्भात थंडीचा जोर ओसरत असून आज गोंदिया जिल्ह्यात ११ पूर्णांक २ अंश सेल्सियस  इतक्या सर्वात कमी किमान तापमानाची नोंद करण्यात आली. त्या पाठोपाठ गडचिरोली इथं १२ पूर्णांक २ तर भंडारा इथं  **13** अंश सेल्सिअस आणि नागपुरात **13** पूर्णांक  **2** अंश  सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे.  दरम्यान आज अकोला इथं  **32** पूर्णांक  **8** इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आलं.

*****